# भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा

## मराठी विभाग

## अहवाल : २०२०-२१

शैक्षणिक सत्रात २०२०-२१ कोरोना संक्रमणामुळे आणि शासनाच्या लॉकडाऊनच्या आदेशामुळे प्रत्यक्ष महाविद्यालयीन वर्ग सुरू झाले नाही. तसेच उन्हाळी २०२० च्या विद्यापीठीय परीक्षा सुद्धा कोरोना संक्रमणामुळे खूप लांबल्या त्यामुळे याचा परिणाम २०२०-२१ च्या सत्रावर झाला. पर्यायाने हे सत्र उशीराने सुरू झाले. शासनाच्या आदेशानुसार वर्क फ्रॉम होम सुरू झाले. या सत्रात महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांना विभागातील प्रोफेसर डॉ. प्रमोद गारोडे व प्रा. रवींद्र खंडेराव यांनी खालील वर्गाला अभ्यासक्रमानुसार आवश्यक ते अभ्यास साहित्य पुरविले.

➢ **प्रोफेसर डॉ. प्रमोद गारोडे** यांनी या शैक्षणिक सत्रात खालील वर्गांना शिकविले-

१. बी. ए. भाग-१ (अ व ब सेक्शन) - मराठी साहित्य
२. बी. ए. भाग-३ - मराठी साहित्य
३. बी. कॉम. भाग-१ (मराठी व इंग्रजी माध्यम) - मराठी अनिवार्य
४. बी. कॉम. भाग-२ (मराठी व इंग्रजी माध्यम) - मराठी अनिवार्य
५. बी. कॉम. भाग-३ (मराठी व इंग्रजी माध्यम) - मराठी अनिवार्य
६. एम. ए. मराठी भाग-२ - पेपर पहिला- उपयोजित मराठी
७. एम. ए. मराठी भाग-२ - पेपर दुसरा - भाषाविज्ञान
८. एम. ए. मराठी भाग-२ - पेपर तिसरा - संत चोखामेळा
९. एम. ए. मराठी भाग-२ - पेपर चवथा - दलित साहित्य

➢ **प्रा. रवींद्र खंडेराव** यांनी या शैक्षणिक सत्रात खालील वर्गांना शिकविले-

१. बी. ए. भाग-१ (अ व ब सेक्शन) - मराठी अनिवार्य
२. बी. ए. भाग-२ - मराठी अनिवार्य
३. बी. ए. भाग-२ - मराठी साहित्य
४. बी. ए. भाग-३ - मराठी अनिवार्य
५. एम. ए. मराठी भाग-१ - पेपर पहिला- मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी
६. एम. ए. मराठी भाग-१ - पेपर दुसरा - साहित्यविचार
७. एम. ए. मराठी भाग-१ - पेपर तिसरा - लोकसाहित्य
८. एम. ए. मराठी भाग-१ - पेपर चवथा - कविता

**दि. २७ फेब्रुवारी २०२१ ला** झुम मिटींगद्वारे आभासी पद्धतीने मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने **माझा मराठीची बोलू कौतुके, परी अमृतातेही पैजा जिंके** या विषयावर ज्येष्ठ कवयित्री, समीक्षक डॉ. शोभा रोकडे, अमरावती यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. ए. उमेकर होते. यावेळी बोलतांना डॉ. शोभा रोकडे यांनी मराठी भाषेची महती संत ज्ञानेश्वरांनी कशी वर्णन केली हे सांगून आजच्या मराठी भाषेतील विविध साहित्य प्रवाहांचा आढावा घेतला.

या कार्यक्रमाचे आयोजन पद्व्युत्तर मराठी विभागाच्या वतीने प्रोफेसर डॉ. प्रमोद गारोडे यांनी केले होते.







दि. १०/०६/२०२१ ला **मराठी साहित्य निर्मितीः संकल्पना व स्वरूप** या विषयावर प्रोफेसर डॉ. प्रमोद गारोडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. रवींद्र खंडेराव होते.

दि. २१/०६/२०२१ ते ०५/०७/२०२१ या कालावधीमध्ये मराठी विभागाच्या वतीने एम.ए. भाग-२ मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांकरिता पंधरा दिवसीय ३० तासांचा **प्रसारमाध्यमांकरिता लेखन कौशल्य प्रमाणपत्र कोर्स** चे आयोजन करण्यात आले होते.या प्रमाणपत्र कोर्सला २० विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. ११ ऑगस्ट २०२१ लर IPR अंतर्गत **लेखन आणि वाचन कौशल्य** या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला सी एम कढी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख तथा

प्रभारी प्राचार्य डॉ. काशिनाथ बऱ्हाटे, सिपना कॉलेज, चिखलदरा येथील मराठी विभाग प्रमुख डॉ. आनंद डुडूल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर ए उमेकर होते.

या शैक्षणिक सत्रात मराठी विभागातील **प्रोफेसर डॉ. प्रमोद गारोडे** यांना त्यांच्या **महानुभावीय सातीग्रंथ : ज्ञानप्रबोध** या शोधनिबंधा करिता Research Excellence Award-2020, Institute of Scholars, Bangalor चा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला.

तसेच त्यांची **महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीवर सदस्य** म्हणून पाच वर्षांकरिता नियुक्ती झाली.

सत्र २०२०-२१ मध्ये **डॉ. प्रमोद भीमराव गारोडे** यांनी विद्यापीठाच्या विविध समित्यांवर कार्य केले तसेच त्यांचे पाच शोधनिबंध विविध जर्नल मध्ये प्रकाशित झाले असून एक शोधनिबंध प्रकाशनाकरिता स्वाकारला आहे.

प्रा.रवींद्र खंडेराव
मराठी विभाग प्रमुख
बी.एस.पाटील महाविद्यालय
परतवाडा

Principal
B.S.Patil Mahavidhyalaya,
Achalpur Camp (Paratwada)